# नियमित दिवाणी दावा क्रमांक २०/२०१६ मधील नि.क्र.१८ वरील आदेश

(CNR No. MHAH250000772016)

१. प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी सदरचा अर्ज त्यांचेविरुध्द पारीत झालेला विना कैफियतचा आदेश रद्दबातल होऊन त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी या बाबत विनंती केली आहे.

२. प्रतिवादींचे अर्जातील कथन असे आहे की, सदर दाव्यात प्रतिवादी नं. १ ते ९ यानी मुदतीत कैफीयत देणे आवश्यक होते. परंतु कैफीयत देणेकामी लागणारी आवश्यक ती महत्वाची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना कैफीयत मुदतीत देता आली नाही. सदर प्रतिवादींना त्यांची कैफीयत देण्यास संधी न मिळाल्यास त्यांचे अतोनात नुकसान होवुन त्यांना नैसर्गिक न्यायापासुन वंचित रहावे लागेल. सबब विना कैफियत आदेश रद्दबातल करण्यात येऊन त्यांची कैफियत स्वीकारण्यात यावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

३. सदर अर्जावर वादींचे म्हणणे मागविण्यात आले. सदर अर्जावर वादी यांनी आपले म्हणणे देवून असे कथन केले आहे की, अर्ज खोटा असुन त्यातील कथने चुकीची आहेत. प्रतिवादींना समन्सची बजावणी दि. १९/११/२०१९ रोजी झाली असुन प्रतिवादी हे दाव्यात हजर झालेले आहेत. त्यांनी वेळोवेळी मुदतीचे अर्ज देवुन मुदती घेवुन देखील कैफीयत सादर केलेली नाही. दि. १३/८/२०२२ रोजी सदर दावा विना कैफीयत चौकशीवर नेमलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा. अर्ज मंजूर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट आकारण्यात यावी.

४. अर्ज व म्हणणे वाचले. सदरचा दावा वादींनी प्रतिवादींविरुध्द जाहीर ठराव व मनाई हुकुमासाठी केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र.१ ते ९ यांना समन्सची बजावणी होवुन ते दि. १९/११/२०१९ रोजी वकीलांमार्फत हजर झाले व कैफीयत मुदतीचा अर्ज देवुन मुदत घेतली आहे. तदनंतर त्यांनी दि. २८/११/२०२२ रोजी प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. सदर दाव्यामध्ये नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकून घेणे गरजेचे आहे. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेतल्यास दावा गुणावगुणावर चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी वादीच्या दाव्यास कैफियत दाखल करण्यास केलेल्या विलंबाचा विचार करता वादींना खर्चाची रक्कम देऊन तो विलंब भरुन काढता येईल. सबब, पुढील

प्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादी क्र.१ ते ९ यांनी रक्कम रुपये रु. १,८००/– (रक्कम रुपये एक हजार आठशे फक्त) वादींना खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी वादीस खर्च दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे.

३. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम वादींना पुढील तारखेपर्यंत द्यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2023.08.04 15:52:23 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः– ०४/०८/२०२३

२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पारनेर.